# ओबीसी समाजातील अधिकारी कर्मचारी, विद्यार्थी व शेतकरी यांच्याशी संबंधित मागण्या पूर्ण करण्याहेतूने निवेदन.

ओबीसी अधिकारी कर्मचारी संघ
र.नं.-३०५
प्रशिक्षण, प्रबोधन, संघटन

+९१ ८७९६४५५२१६

१२०४, १२ वा माळा, कामधेनू, इंटरनॅशनल ट्रेड सेंटर, सेक्टर १४, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र ४१०२१०

info@obcadhikarikarmacharisangh.com

www.obcadhikarikarmacharisangh.com

**महोदय,**

ओबीसी अधिकारी कर्मचारी संघ हे ओबीसी, व्हीजेएनटी व एसबीसी समाजातील अधिकारी कर्मचारी, शेतकरी, विद्यार्थी यांच्या न्याय मागण्यांसाठी नेहमी पुढाकार घेत असतो. नुकतेच ११ ऑगस्ट २०२४ रोजी ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाचे राज्य अधिवेशन नवी मुंबई येथील खारघर येथे आयोजित करण्यात आले होते. त्या माध्यमातून मा. महोदय वरील विषयांच्या संबंधाने समाजाच्या खालील मागण्यांचा ठराव पारित करण्यात आले. तरी आपण या मागण्यांचा सहानुभूती पूर्वक विचार करून मागण्या पूर्ण कराव्यात ही विनंती.

# अधिकारी कर्मचारी संबधित मागण्या

1. जुनी पेन्नान योजना लागू करण्यात यावी.

2. राज्य सरकारने कंत्राटी भरती रद्द करत राज्यातील ओबीसीसह सर्व प्रवर्गातील शासकीय, निमशासकीय पदांचा अनुशेष तात्काळ भरण्यात यावा.

3. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेत सेवा निवृत्त शिक्षक डीएड, बीएड अर्हता धारक उमेदवार निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्त करणेबाबतचा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण- २०२४/प्र.क्र.६६६/टिएनटि-१, ०५ सप्टेंबर, २०२४ रोजी काढला आहे. हा शासन निर्णय रद्द करण्यात यावा, व पूर्ण वेळ ही पदे भरण्यात यावी.

4. पी.एचडी धारक प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना जास्तीच्या दोन वेतन श्रेणी लागू कराव्यात.

5. सलग चोवीस वर्ष एकाच वेतनश्रेणी मध्ये सेवा देणाऱ्या शिक्षकांना सरसकट निवड श्रेणी लागू करण्यात यावी.

6. पेसा क्षेत्रातील सर्व शासकीय पदभरती मध्ये बिगर आदिवासी उमेदवारांना संधी देण्यात यावी.

# पाल्यांच्या संबधित मागण्या

1. विविध शासकीय, आर्थिक, शैक्षणिक, कृषीविषयक योजनांसाठी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र पात्रता धारक म्हणून अंतिम समजण्यात यावे. याव्यतिरिक्त उत्पनाचा वेगळा दाखला मागण्यात येऊ नये.

2. शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या मुलींच्या उच्च शिक्षणातील शुल्क फी सवलतीसाठी असलेल्या उत्पनाची मर्यादा काढून सरसकट सर्व मुलींना शुल्क माफी देण्यात यावी.

3. खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस, बीडीएस व आयुर्वेदिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील प्रवेशात मागासवर्गीय ओबीसी, एससी, एसटी, व्हीजे, एनटी या संवैधानिक वर्गाबाबत ५० टक्के आरक्षण कपातीचे धोरण रद्द करुन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालया प्रमाणे एमबीबीएस, बिडीएस व आयुर्वेदिक पदवी व पदव्युत्तर प्रवेशातील १०० टक्के आरक्षण धोरण लागू करण्यासाठी संबधित विभागाला निर्देश देण्यात यावे.

4. मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजनेतील पात्र विद्यार्थ्यांना तात्काळ निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

5. ओबीसी वसतिगृह सुरू करण्यात यावे.

6. महाज्योती, सारथी, बार्टी, टार्टी या स्वायत्त संस्थांमध्ये समान धोरनांतर्गत मिळणाऱ्या योजनांची वाटणी ही प्रवर्गनिहाय लोकसंख्येच्या आधारावर करण्यात यावी. तसेच परदेशी शिष्यवृत्ती अनुषंगाने ओबीसी विद्यार्थ्यांसाठी आठ लाखाची मर्यादा व खुल्या वर्गासाठी 20 लाखाची मर्यादा ही तफावत दूर करण्यात यावी.

7. शिष्यवृत्ती योजनेतील दीड लाख रुपयांच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करून केंद्र सरकारच्या पीएम यशस्वी योजनेच्या अधिसुचनेनुसार रूपये २.५ लाख इतकी वाढ करण्यात यावी.

8. मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजनेतील पात्र विद्यार्थ्यांना तात्काळ निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

9. ०१ जानेवारी २०२२ पासून नोंदणी असणाऱ्या ओबीसी, भटके विमुक्त व एस.बी.सी आणि अल्पसंख्याक समाजातील पूर्णवेळ पि.एच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना महाज्योतीच्या मार्फत देण्यात येणारी "महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती" गेल्या दोन वर्षापासून प्रलंबित आहे, तरी बार्टी प्रमाणे १०० टक्के दराने नोंदणी दिनांकापासून फेलोशिप अदा करावी.

# सामाजिक न्यायासाठी प्रशासकीय स्तरावरील मागण्या

1. ओबीसींना संख्येच्या प्रमाणात व वेगळे बजेट देण्यात यावे. (मिळणारा बजेट अतिशय तुटपुंज्या स्वरूपाचा असून वर्षागणिक प्रमाण कमी होत चालला आहे.)

2. **"कास्ट सर्टिफिकेट"** प्रमाणपत्राचे शीर्षक (Heading) बदलून **"सामाजिक न्यायाचे प्रमाणपत्र"** (Certificate of Social Justice") असे करणे- जे आरक्षणाचा आधार म्हणून कास्ट ऐवजी सामाजिक न्यायाच्या समजुतीला आणि संविधानिक संकल्पनेला प्रोत्साहन देण्यास मदत करेल. आणि अशा प्रकारे समाजात सामाजिक एकोपा आणि बंधुत्वाचा मार्ग मोकळा करेल.

3. कास्ट सर्टिफिकेट (सामाजिक न्यायाचे प्रमाणपत्र) तयार करण्यासाठी आवश्यक 1967 किंवा त्यापूर्वीच्या वास्तव्याचा कागदोपत्री (दस्तऐवज) पुरावा च्या अनुपस्थितीत, कास्ट सर्टिफिकेट जारी करण्याच्या पद्धतीसंदर्भात महाराष्ट्र सरकारच्या दिनांक 31 ऑगस्ट 2012 च्या अधिसूचना नियम क्रमांक 3 नुसार, कास्ट सर्टिफिकेट सर्कल एंकवायरी रिपोर्ट (ग्रुह चौकशी अहवाल) आधारे जारी केले पाहिजे जेथे एसडीओला या अधिसूचनेच्या नियम क्रमांक 3 नुसार ही चौकशी करण्याचे अधिकार आहेत परंतु या तरतुदीच्या अनुषंगाने, एसडीओ योग्य कारवाई करत नाही त्यामुळे अनेक पात्र ओबीसी अर्जदारांना कास्ट सर्टिफिकेट नाकारले जाते. या संदर्भात स्पष्ट आदेश देण्यात यावा.

4. तलाठी कार्यालयात नॉन-क्रिमलेयर प्रमाणपत्रासाठी अर्ज करताना सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारातून मिळणारे उत्पन्न वगळून संपत्तीच्या इतर स्त्रोतांकडून मिळणारे उत्पन्न तलाठीने विचारून फॉर्म भरावा. या संदर्भात स्पष्ट स्वतंत्र आदेश जारी केला पाहिजे.

5. सर्व जिल्ह्यातील महसूल विभागातील सर्व कर्मचारी (तलाठी, एसडीओ, कलेक्टर) २५ मार्च २०१३ च्या महाराष्ट्र सरकारचा शासन निर्णयाच्या नॉन- क्रीमलेयर नियमांसंदर्भातील तरतुदींचा अभ्यास आणि समजून घेण्यासाठी वेळोवेळी प्रशासकीय स्तरावर जागरूकता कार्यशाळा आयोजित करावी.

6. आरक्षणासाठी मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करू नये व सरसकट मराठ्यांना ओबीसी जात प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. तसेच सगेसोयऱ्यांची अधिसुचना तात्काळ रद्द करावी.

7. पेसा क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये राजकीय आरक्षण हे फ़िरते ठेवण्यात यावे.

8. ओबीसींना पदोन्नतीं आरक्षण लागू करण्यात यावे.

9. बिहारच्या धर्तीवर राज्यात सर्व समाजांचे जातीनिहाय जनगणना सर्वेक्षण करून राज्यात सामाजिक न्याय प्रस्थापित करावे. तसेच केंद्र स्तरावर जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, यासाठी पाठपुरावा करणे.

10. ओबीसी शेतकऱ्यांना अनुदान मदत मिळावी तसेच एससी, एसटीच्या धर्तीवर ओबीसी शेतकऱ्यांसाठी योजना राबविण्यात यावे.

**धन्यवाद..!**

**आपला**
**राम वाडीभष्मे**
**ओबीसी अधिकारी कर्मचारी संघ**

# शिष्टमंडळामध्ये उपस्थितांची नावे

**राम वाडीभष्मे,**
महासचिव
ओबीसी अधिकारी कर्मचारी संघ

**डॉ . शिवशंकर गोरे,**
(बुलढाणा) सल्लागार - ओबीसी अधिकारी कर्मचारी संघ

**मागेश्वर हटवार,**
(नागपूर) सामाजिक विचारवंत व ओबीसी अभ्यासक

**महादेव मिरगे,**
LIC विभाग (मुंबई) विभागीय अध्यक्ष - ओबीसी अधिकारी कर्मचारी संघ

**औदुंबर सुतार,**
(सोलापूर) ओबीसी अधिकारी कर्मचारी संघ, रेल्वे सेल

**विजय केसरकर,**
(कोकण) कोकण विभागीय अध्यक्ष - ओबीसी अधिकारी कर्मचारी संघ

**विजय राहाटे,**
(SBI) ओबीसी अधिकारी कर्मचारी संघ, महासचिव बँकिंग सेल

**अनिल भोईर,**
(ठाणे) ओबीसी कार्यकर्ते व अभ्यासक

**प्रकाश पाटील,**
(ठाणे) शिक्षण विभागीय अध्यक्ष

**भरत निचिते,**
(ठाणे) ओबीसी उपोषणकर्ते

**संतोष आंबेकर,**
(मुंबई) संयोजक - सर्व समाज ओबीसी आघाडी

**महेश राऊत,**
(सातारा ) ओबीसी कार्यकर्ते

**ज्ञानेश्वर चंदे,**
(ठाणे) ओबीसी कार्यकर्ते

**नामदेव तिवरे,**
(ठाणे) ओबीसी कार्यकर्ते

ओबीसी अधिकारी कर्मचारी संघ
र.नं.-३०५
प्रशिक्षण, प्रबोधन, संघटन

# धन्यवाद..!!

+९१ ८७९६४५५२१६

१२०४, १२ वा माळा, कामधेनू, इंटरनॅशनल ट्रेड सेंटर,
सेक्टर १४, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र ४१०२१०

info@obcadhikarikarmacharisangh.com

www.obcadhikarikarmacharisangh.com

